MHSN090013342019

# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १६२/२०१९**
**निशाणी क्रमांक २८ खालील आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. वर्धमान कोगनोळे. | **वादी.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | श्रीमती प्रभावती पाटील वगैरे ०५. | **प्रतिवादी.** |

**(०१).** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करून या न्यायालयाने दिनांक १३.१२.२०१९ रोजी निशाणी क्रमांक ०५ वरील एकतर्फा केलेला आदेश, वादीने दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) ची तंतोतंत पुर्तता केलेली नसल्याकारणावरुन रद्द करण्यात यावा याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्यानुसार दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) नुसार एकतर्फा मनाईचा आदेश वादीच्या लाभात पारित झाल्यानंतर वादीने निशाणी क्रमांक ०५ वरील अर्ज, अर्जासोबतचे शपथपत्र, निशाणी क्रमांक ०१ ची प्रत आणि दाव्यासोबत दाखल केलेली सर्व कागदपत्रे रजिस्टर पोष्टाने प्रतिवादी यांना पाठवणे कायद्याने आवश्यक व बंधनकारक आहे, परंतु तसे झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून प्रतिवादींनी हा अर्ज दिला आहे.

(०२). वादी यांनी निशाणी क्रमांक ३५ येथे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जास हरकत घेतली आहे. वादीचे कथनानुसार निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश दिनांक १३.१२.२०१९ रोजी सायंकाळी उशिरा झाला असल्याने व तसेच दिनांक १४.१२.२०१९ व १५.१२.२०१९ रोजी सुट्टी असल्यांने वादीस दिनांक १६.१२.२०१९ रोजी निशाणी क्रमांक ०५ वरील आदेशाची माहिती मिळालेली आहे व त्यादिवशी लगेचच वादींनी दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) प्रमाणे पुर्तता करुन न्यायालयात वादीचे शपथपत्र व रजिस्टर पोष्टाच्या पोहोच पावत्या दाखल केल्या आहेत. वादीचे पुढे कथन आहे की, निशाणी क्रमांक ०५ वरील एकतर्फा आदेश करतेवेळी न्यायालयाने सदर आदेशाची अमंलबजावणी करण्याकरिता विशेष बेलीफाची नेमणूक केलेली होती व त्यानुसार दिनांक २४.१२.२०१९ रोजी प्रतिवादीवर दाव्याची नोटीस व सोबतची कागदपत्रे यांची बजावणी झालेली आहे. वादी यांनी दिनांक १६.१२.२०१९ रोजी विशेष बेलीफ भत्ता भरलेला आहे. सबब, प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

(०३). दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कबूल तथ्यानुसार या न्यायालयांने दिनांक १३.१२.२०१९ रोजी या दाव्यातील निशाणी क्रमांक ०५ वर एकतर्फा सुनावणी घेवून वादीच्या लाभात अंतरिम मनाई आदेश पारित केला आहे. ही बाब विशेषत्वाने येथे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर कामी कॅव्हेट दाखल असतांनाही असा आदेश या न्यायालयांने वादीच्या

लाभात केलेला आहे. सबब, दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) प्रमाणे तंतोतंत पुर्तता करणे हे कायद्याने वादीकडून अपेक्षीत आहे. या तरतुदी बंधनकारक अशा आहेत की ज्यांचे पालन न झालेस वादीच्या लाभात पारित केलेला एकतर्फा आदेश मागे घेणे हे न्यायालयावर बंधनकारक आहे. वादीने अर्जावर दिलेले म्हणणे विचारात घेता असे दिसून येते की, त्यांनी केवळ निशाणी क्रमांक ०५ व त्यावरील आदेशाची प्रत रजिस्टर पोष्टाने प्रतिवादी यांना पाठवलेल्या आहेत. दावा तसेच दाव्या सोबतची कागदपत्रे ही विशेष बेलीफामार्फत प्रतिवादी यांचेवर बजावली आहेत. त्यामुळे दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) प्रमाणे पुर्तता केली आहे असे न्यायालयाने समजावे असा वादीच्या युक्तीवादाचा रोख असल्यांचे दिसून येते. मी वादीच्या या युक्तीवादास सहमत नाही यांचे कारण असे आहे की दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) नुसार आवश्यक असलेली पुर्तता करणे हे वादीवर अत्यावश्यक व बंधनकारक आहे. याकरिता प्रतिवादींनी नामदार दिल्ली उच्च न्यायालयाकडील *मे. अश्वीनी पान प्रॉडक्ट प्रा. लि. विरुध्द कृष्णा ट्रेडर्स, सी एस (ओ एस) नंबर २८४/२०१२ निकाल तारीख ०२.०३.२०१२* या न्यायनिवाडयाचा आधार घेतला आहे, ज्यामध्ये नामदार दिल्ली उच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक १३ मध्ये असे निर्देशित केले आहे की, कायदा जर एखाद्या तरतुदीचे पालन एका विशिष्ठ प्रकारे करणे अपेक्षीत आहे असे म्हणत असेल तर ते तसेच करणे आवश्यक आहे व त्यास फाटा देता येणार नाही. जर वादीने दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) नुसार पुर्तता केली नसेलतर त्यांच्या लाभात झालेला एकतर्फा मनाई

आदेश रद्द करण्याशिवाय पर्याय उरत नाही. या न्यायनिवाडयाचा उचित सन्मान राखून माझे असे मत आहे की, तो याकामी तंतोतंत लागू पडतो कारण वादीने दाखल केलेल्या म्हणण्यावरुन त्यांनी दिवाणी प्रक्रिंया संहिता आदेश ३९, नियम ३(अ) ची पुर्तता तंतोतंत केलेली नाही हे स्पष्ट होत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**०२.** निशाणी क्रमांक ०५ वरील दिनांक १३.१२.२०१९ रोजी पारित केलेला एकतर्फा मनाई आदेश रद्द करण्यात येतो.

Kiran Rajaram Khondre

Digitally signed by Kiran Rajaram Khondre
Date: 2020.01.29 17:58:14 +0530

**तासगांव.** (किरण रा. खोंद्रे)

दिनांक : २९ जानेवारी २०२०. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. रुपेश शिवाजी पोळ.

न्यायालय – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव,
जिल्हा सांगली.

दिनांक – २९ जानेवारी २०२०.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – २९ जानेवारी २०२०.

आदेश अपलोड दिनांक – ३० जानेवारी २०२०.